Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 August 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

बांग्लादेशमधल्या अराजकतेच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीय सर्वपक्षीय बैठक झाली. यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी बांग्लादेशातल्या परिस्थितीची माहिती दिली. संसद भवनात झालेल्या या बैठकीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते.

दरम्यान, यासंदर्भात परराष्ट्र मंत्री जयशंकर आज संसदेच्या दोन्ही सदनात निवेदन देणार आहेत.

****

देशाची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात जागतिक स्तरावर अव्वल तीन क्रमांकामध्ये पोहोचली असल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी याचं श्रेय युवा शक्तीला दिलं आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे ही माहिती दिली आहे.

****

गेल्या दहा वर्षात डाव्या विचारसरणीचा अतिरेक हा लक्षणीयरित्या कमी झाला असून, देश त्याचा साक्षी असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. एप्रिल २००४ ते एप्रिल २०१४ च्या तुलनेत, मे २०१४ ते एप्रिल २०२४ या कालावधीत डाव्या विचारसरणीच्या प्रकरणांमध्ये ५३ टक्के घट झाली आहे. लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात मंत्री नित्यानंद राय यांनी ही माहिती दिली. डाव्या विचारसरणीने प्रभावित जिल्ह्यांची संख्या ३८ झाली असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

तामिळनाडुमधल्या सुलार इथं तरंगशक्ती २०२४ या पहिल्या बहुराष्ट्रीय हवाई युद्ध सरावाला आजपासून सुरुवात होत आहे. या सरावात जवळपास ३०० देश सहभागी होत असून, त्यापैकी दहा देश लढाऊ विमानांसह सहभागी होत आहेत. हा सराव

दोन टप्प्यात आयोजित केला असून, पहिला सराव आजपासून ते १४ ऑगस्टपर्यंत सुलार इथं, तर दुसरा टप्पा २९ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर दरम्यान राजस्थानमध्ये जोधपूर इथं होणार आहे. भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल ए पी सिंग यांनी ही माहिती दिली. तेजस, राफेल, मिराज २०००, जग्वार, मिग २९ यासह भारताची इतर लढाऊ विमानं या सरावात सहभागी होत आहेत. या युद्ध सरावादरम्यान प्रशिक्षण, भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना भेट, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत चालू आर्थिक वर्षात परंपरागत कृषी विकास योजना राबवण्यासाठी केंद्र हिश्श्याचा २३ लाख रुपये आणि राज्याचा १५ लाख ३३ हजार रुपये, निधी कृषी आयुक्तालयास वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला.

****

येत्या काळात देशाला आणि जगाला कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आपला महाराष्ट्र देईल, असा विश्वास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. अमळनेर इथं यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या उपकेंद्राचं भूमिपूजन काल त्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. येणाऱ्या काळात सर्वोत्तम कौशल्य असलेली पिढी घडवण्यासाठी कौशल्य विकास शिक्षणावर खर्च करायचा असून, अनेक देशांना उत्तम मनुष्यबळाची आवश्यकता आहे ती आपल्याला पूर्ण करायची असल्याचा मानस पाटील यांनी व्यक्त केला.

****

पुण्यात झिका विषाणूचे आणखी सात नवे रुग्ण आढळले आहेत. यामध्ये पाच गर्भवतींचा समावेश आहे. संपूर्ण पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ७२ जणांना झिका विषाणूची लागण झाली आहे.

****

पालघर जिल्ह्यातल्या नंडोरे आश्रमशाळेतल्या मुलांना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. जिल्ह्यातल्या आणखी काही आश्रमशाळांमधल्या मुलांना जेवणातून विषबाधा झाल्याचं समोर आल्याचं, रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. चंद्रकांत लोहारे यांनी सांगितलं. ग्रामीण रुग्णालयात सध्या ३० मुलांवर उपचार सुरू असून आणखीन काही मुलं दाखल होण्याची शक्यता असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आज हॉकीमध्ये भारताचा उपान्त्य फेरीचा सामना जर्मनीसोबत होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साडे दहा वाजता या सामन्याला सुरुवात होईल. पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताचा नीरज चोप्रा पहिल्या फेरीसाठी मैदानात उतरेल. तर भारताचा किशोर कुमार जेना देखील भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित करण्यासाठी आज पात्रता फेरीत खेळणार आहे. महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धेत आज मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत या खेळाडूंच्या चमूची उपांत्यपूर्व फेरीची लढत होणार आहे, तर पुरुष टेबल टेनिसमध्येही आज उपांत्यपूर्व फेरीची लढत होणार आहे. महिला कुस्तीपटू विनेश फोगट ५० किलो वजनी गटात उपउपांत्य-पूर्व फेरीत खेळणार आहे. तर महिलांच्या चारशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताची किरण पाहल सहभागी होईल.

****

अमरनाथ इथल्या शिवलिंगाच्या दर्शनासाठी एक हजार ८७३ यात्रेकरुंचा जत्था जम्मुच्या भगवतीनगर आधार शिबीरातून आज रवाना झाला आहे.

****